आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ जानेवारी २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- सन २०३० पर्यंत ५० टक्के बिगरजीवाश्म इंधनाचा पर्याय स्वीकारण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याची केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांची ग्वाही
- मस्साजोग सरपंच हत्येप्रकरणी दोषी आढळणारे कुणीही असले तरी त्यांना सोडलं जाणार नाही, मात्र पुरावे नसतांना आरोप करणं योग्य नसल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं मत

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ५२८ अंकांची घसरण

**<><><><><>**

भारतीय समुदाय जगभर उत्तम कामगिरी करत असून देशाला त्याचा अभिमान आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज ओदिशामध्ये भुवनेश्वर इथं १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते.

**होल्ड 'बाईट'**

प्रवासी भारतीय दिवस संमेलन, हा केंद्रसरकारचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम, परदेशात स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाला परस्परांच्या संपर्कात येऊन संवाद साधण्यासाठी महत्त्वाचं व्यासपीठ प्रदान करतो. भारतीय समुदायाच्या पर्यटनासाठी खास तयार करण्यात आलेल्या 'प्रवासी भारतीय एक्स्प्रेस'ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दृक्श्राव्य माध्यमातून हिरवा झेंडा दाखवला.

कालपासून प्रवासी भारतीय दिन सोहळ्याला सुरुवात झाली. 'परदेशस्थ भारतीयांचं विकसित भारतासाठी योगदान', ही यंदाच्या तीन दिवसीय प्रवासी भारतीय दिवस सोहळ्याची संकल्पना आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या समारोप समारंभाला उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्या परदेशस्थ भारतीय समुदायाच्या सदस्यांना विविध क्षेत्रातल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'राष्ट्रपती प्रवासी भारतीय सन्मान' प्रदान करतील.

<><><><><>

शाश्वत भविष्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दृष्टिकोनाला अनुसरून, २०३० सालापर्यंत ५० टक्के बिगर जीवाश्म इंधनाचा पर्याय स्वीकारण्यासाठी भारत वचनबद्ध असल्याचं केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत नवीकरणीय ऊर्जा या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उदघाटन सत्रात बोलत होते. भारतामध्ये नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत विपुल प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे प्रगत तंत्रज्ञानाच्या मदतीने हरित ऊर्जा क्षेत्र आर्थिक दृष्ट्या व्यवहार्य बनवण्यावर विशेष भर दिला जात असल्याचं ते यावेळी म्हणाले. जगभरात हरित ऊर्जेपासून बनवलेल्या उत्पादनांची वाढती मागणी लक्षात घेता, आपल्या नवीकरणीय ऊर्जा स्त्रोतांचा पुरेपूर लाभ घेण्याचं भारताचं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी, तीन स्तरावर चौकशी सुरू असून, जे कुणी दोषी असतील, त्यांना सोडलं जाणार नाही, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात बातमीदारांशी बोलत होते.

या प्रकरणात वरिष्ठ पातळीवरचं कुणी दोषी आढळलं तर त्यांच्यावर पक्ष न बघता, कारवाई करावी अशी विनंती आपण मुख्यमंत्र्यांकडे केली आहे, मात्र पुरावे नसतांना कोणावरही, आरोप करणं योग्य नाही, आरोप करणाऱ्यांकडे पुरावे असतील, तर ते त्यांनी तपास यंत्रणांना द्यावेत, असं अजित पवार म्हणाले. त्यांनी आज पुण्यातल्या प्रलंबित विकास कामांचा आढावा घेतला.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या सरपंच हत्याप्रकरणातला आरोपी वाल्मिक कराडवर ईडीनं कारवाई का केली नाही, असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. त्या आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होत्या. कराडला मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात ईडीनं यापूर्वीच नोटीस दिली होती. मात्र कुठलीही कारवाई झाली नाही. ती झाली असती तर सरपंच हत्याप्रकरण घडलंच नसतं, अस त्या म्हणाल्या.

<><><><><>

शेतकऱ्यांनी पिकवलेल्या तृणधान्याला योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी पणन विभागाची आहे, असं प्रतिपादन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी आज पुण्यात केलं. ते आज पुण्यात पणन मंडळाच्या वतीनं आयोजित भरडधान्य महोत्सवाचं उद्घाटन करताना बोलत होते. भरडधान्य जनजागृतीसाठी काढलेल्या दुचाकी फेरीलाही रावल यांनी हिरवा झेंडा दाखवला.

राज्याच्या विविध भागातून भरडधान्य उत्पादक, प्रक्रिया उद्योगामध्ये कार्यरत असणारे बचतगट, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, स्टार्ट अप कंपन्या यात सहभागी झाल्या आहेत. हा महोत्सव १२ जानेवारीपर्यंत सुरू राहणार आहे.

<><><><><>

छोटे व्यापारी आणि सर्वसामान्य जनतेवरचा करांचा बोजा कमी करण्यासाठी वस्तू आणि सेवा कराचं नवीन प्रारूप येत्या अर्थसंकल्पात लागू करावं अशी मागणी काँग्रेसचे सरचिटणीस सचिन पायलट यांनी केली आहे. मुंबईत गांधी भवन इथं ते आज वार्ताहरांशी बोलत होते.

भाजपा सरकार अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे चित्र निर्माण करत आहे पण खरी परिस्थिती वेगळी आहे. सरकारला योग्य वाटतील तेच आकडे जाहीर केले जात आहेत. उलट काँग्रेस सरकार असताना मात्र वस्तुस्थिती मांडली जात होती, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज घसरणीचा जोर राहिला. शेअर बाजाराचा सेन्सेक्स ५२८ अंकांनी घसरला आणि ७७ हजार ६२० अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १६२ अंकांनी घसरला आणि २३ हजार ५२६ अंकांवर बंद झाला.

बांधकाम, आणि तेल आणि वायू क्षेत्रातल्या समभागांनी आज सर्वात जास्त घसरण नोंदवली.

**<><><><><>**

राज्यात अनधिकृत मासेमारी नौकांवर नजर ठेवण्यासाठी ड्रोनच्या सहायानं देखरेख ठेवणारी डिजिटल डेटा मेंटेनन्स यंत्रप्रणाली राबवायला आजपासून सुरुवात झाली. मत्स्यव्यवसाय आणि बंदरमंत्री नितेश राणे यांनी आज मुंबईतल्या आयुक्त कार्यालयात नियंत्रण कक्षाचं उद्घाटन केलं. मुंबई शहरात ससून गोदी, मुंबई उपनगरात गोराई, ठाण्यात उत्तन, पालघरमध्ये शिरगाव, रायगड जिल्ह्यात वर्सोली आणि श्रीवर्धन, रत्नागिरीत भाट्ये आणि मिरकरवाडा, तसंच सिंधुदुर्गात देवगड,

अशा नऊ ठिकाणी ड्रोनद्वारे देखरेख ठेवली जाणार आहे. आमचे रत्नागिरीचे वार्ताहर अनिकेत कोनकर यांनी याबाबत माहिती दिली.....

**होल्ड - बाईट - अनिकेत कोनकर**

*(अवैध मासेमारी रोखण्यासाठी गस्ती नौका कार्यरत असतात; मात्र त्याद्वारे होणाऱ्या तपासणीला मर्यादा आहेत. ड्रोनच्या वापरामुळे कायद्याच्या कठोर अंमलबजावणीला मदत होईल. ड्रोनचा वेग जास्त असल्यामुळे एकाच वेळी अधिक क्षेत्र देखरेखीखाली येईल. मासेमारी नौकांच्या मॅपिंगमुळे अनधिकृत मासेमारी नौकांची माहिती सहज उपलब्ध होईल. सागरी पोलीस विभागाशी समन्वय साधून ड्रोन वापरले जाणार आहेत. २४ तासांमध्ये १२० सागरी मैल क्षेत्राचं सर्वेक्षण होईल. एका दिवसात सहा तास सर्वेक्षण करणं बंधनकारक असेल.)*

**<><><><>**

सकारात्मक उपाययोजनांच्या माध्यमातून मानव आणि वन्यजीवांमधला संघर्ष कमी करण्याचा मार्ग निघेल, असा विश्वास वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केला आहे. ते आज चंद्रपूरमध्ये 'वाईल्डकॉन – २०२५' या दोन दिवसीय परिषदेच्या समारोप सत्रात बोलत होते. संरक्षित क्षेत्रांच्या बाहेर वन्यप्राण्यांच्या संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना या विषयावर आयोजित करण्यात आलेली ही देशातली पहिलीच परिषद होती.

वनक्षेत्रात विकास कामं होत असल्यामुळे प्राण्यांच्या अधिवासाची जागा कमी झाली आहे. त्यामुळेच मानव-वन्यजीव संघर्षात वाढ झाल्याचं ते यावेळी म्हणाले. माणसाप्रमाणेच वन्यजीवही जगायला हवेत, यासाठी इतर देशांनी काय उपाययोजना केल्या आहेत, त्याचा वन अधिकाऱ्यांनी अभ्यास करावा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

**<><><><>**

देशभरात सुरू असलेल्या क्षयरोग निर्मूलन अभियानासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहिलं आहे. देशातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन व्हावं यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध असून या अभियानात राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांनीही सहभागी व्हावं असं आवाहन या पत्रातून केंद्रानं केलं आहे.

सर्व कारागृहं तसंच सुधारगृहांमध्ये १०० दिवसांच्या या अभियानाचं आयोजन करण्याचे निर्देशही या पत्रात दिले आहेत. कारागृहांची रचना आणि त्यात असलेली कैद्यांची संख्या यामुळे क्षयरोगाचा संसर्ग वाढण्यासाठी पूरक वातावरण तयार होतं. कैद्यांना भेटायला येणाऱ्या कुटुंबियांमार्फत मग त्याचा प्रसार होतो, त्यामुळे हे अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्याची गरज या पत्रात व्यक्त केली आहे. येत्या ३ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान राज्यांचे आरोग्य विभाग, राज्य तसंच जिल्हा पातळीवरचे क्षयरोग निवारण अधिकारी यांच्या मदतीनं कारागृहांमध्ये निःक्षय शिबिराचं आयोजन करावं, तसंच २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान सर्वांना निःक्षय शपथ द्यावी, असे निर्देश दिले आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगर पालिकेत निःक्षय अभियानांतर्गत निःक्षय क्ष-किरण यंत्र वाहनाचं अनावरण आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी आज केलं. या अभियानांतर्गत लातूर इथं जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते क्षयरुग्णांना पोषण आहार कीटचं वितरण करण्यात आलं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात तुरळक ठिकाणी तापमानात लक्षणीय घट झाली. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान नागपूर इथं ८ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहील.